**कृपया प्रसिध्दीसाठी** **17 नोव्हेंबर 2008**

## विमानाचे इंधन पेट्रोलपेक्षा स्वस्त;
## केंद्र सरकारचे अजब अर्थ शास्त्र : राम नाईक

**मुंबई, सोमवार :** "विमान इंधनाचे (एव्हिएशन टर्बाइन फ्युएल) दर प्रति लिटर रु. 32.98 ने म्हणजेच 45 टक्क्यांनी कमी करुन श्रीमंतांचे लांगूलचालन करण्यापेक्षा डॉ. मनमोहन सिंह यांच्या सरकारने 'आम आदमीला' लागणारे पेट्रोल प्रति लीटर रु. 5, डिझेल रु. 3 तर स्वयंपाकाचा गॅस रु. 50 ने स्वस्त करावा," अशी मागणी माजी पेट्रोलियम मंत्री आणि भाजपा नेते श्री. राम नाईक यांनी केली आहे. कालपासून विमान इंधनाचे दर आणखी कमी झाल्याच्या पार्श्वभूमीवर श्री. नाईक यांनी पुन्हा एकदा ही मागणी केली आहे.

या संदर्भात अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले, "डॉ. मनमोहन सिंह यांच्या सरकारचे पेट्रोलियम क्षेत्राविषयीचे धोरण दिशाहीन झाले आहे. जुलै 2008 मध्ये कच्च्या तेलाची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात प्रति बॅरल 147 डॉलर्स होती, ती नोव्हेंबर मध्ये 56 डॉलर म्हणजेच निम्म्यापेक्षा किती तरी कमी झाली आहे. पेट्रोल - डिझेलच्या किंमती एका आठवड्यात कमी करु अशी घोषणा पेट्रोलियम मंत्री श्री. मुरली देवरा यांनी 23 ऑक्टोबर 2008 रोजी लोकसभेत करुनही अद्याप निर्णय घेतलेला नाही. मात्र विमानासाठी लागणा-या इंधनाचा दर सप्टेंबर 2008 पासून पाचवेळा, त्यापैकी चालू नोव्हेंबर महिन्यातच तीनदा कमी केला आहे. 1 ऑगस्ट रोजी विमान इंधनाचा दर प्रति लीटर रु. 73.67 होता. तो आता रु. 40.69 प्रति लीटर म्हणजेच रु. 32.98 (45 टक्के) ने कमी करण्यात आला आहे. परिणामी, आता मोटारीसाठी लागणा-या पेट्रोलचे दर रु. 55.07 प्रति लीटर, तर विमानाचे इंधन त्यापेक्षाही स्वस्त म्हणजे रु. 40.69 प्रति लीटर झाले आहे."

"बलाढ्य विमान कंपन्यांच्या दबावाला बळी पडून पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह, अर्थ मंत्री डॉ. पी. चिदंबरम्, पेट्रोलियम मंत्री श्री. मुरली देवरा, नागरी विमान वाहतूक मंत्री श्री. प्रफुल्ल पटेल यांनी सामान्य माणसाच्या सहनशीलतेचा अंत पाहाणारे हे अजब अर्थशास्त्र तयार केले आहे. एका बाजूने वाढती महागाई तर दुसरीकडे मंदी यांच्या मध्ये 'आम आदमी' अक्षरशः भरडला जात आहे. पेट्रोलचे दर प्रति लीटर रु. 5, डिझेल प्रति लीटर रु. 3, तर स्वयंपाकाचा गॅस प्रति सिलेंडर रु. 50 ने ताबडतोब कमी केले पाहिजेत. अन्यथा सामान्य जनता येणा-या दिवसात काँग्रेसला धडा शिकवेल," असा इशाराही श्री. नाईक यांनी दिला.

**(कार्यालय सचिव)**